सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, १७ फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३२३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

नवी दिल्ली रेल्वे स्थानकात चेंगराचेंगरी, १८ जणांचा मृत्यू

नवी दिल्ली: नवी दिल्ली रेल्वे स्थानकात शनिवारी रात्री चेंगराचेंगरी झाली. या दुर्घटनेत १८ जणांचा मृत्यू झाला आहे. तर अनेकजण जखमी झाले आहेत. ही घटना रात्री १० वाजण्याच्या सुमारास घडली. प्लॅटफॉर्म क्रमांक १३ आणि १४ वर ही घटना घडली.

घटनेच्या वेळेस हजारोच्या संख्येने भक्तगण प्रयागराज महाकुंभ येथे जाण्यासाठी रेल्वे स्थानकावर एकत्रित जमले होते. तसेच रेल्वेमध्ये चढण्याचा प्रयत्न करत होते. घटनेची सूचना मिळताच दिल्लीच्या एलजी वीके सक्सेना आणि माजी मुख्यमंत्री आतिशी जखमींची विचारपूस करण्यासाठी रुग्णालयात पोहोचले.

कधी घडली ही दुर्घटना?

चेंगराचेंगरीची ही दुर्घटना दहा वाजण्याच्या सुमारास घडली. नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर हजारोंच्या संख्येने लोक जमले होती. पोलीस उपायुक्तांच्या माहितीनुसार, जेव्हा प्रयागराज एक्सप्रेस रेल्वे प्लॅटफॉर्म क्रमांक १४वर उभी होती तेव्हा मोठ्या संख्येने लोक तेथे उपस्थित होते. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, स्वतंत्रता सेनानी एक्सप्रेस आणि भुवनेश्वर राजधानी एक्सप्रेस उशिराने धावत होती आणि या रेल्वेचे प्रवासी प्लॅटफॉर्म क्रमांक १२, १३ आणि १४ वर होते.

रेल्वे पोलीस आणि दिल्ली पोलिसांनी जखमींना एलएनजेपी आणि लेडी होर्डिंग रुग्णालयात दाखल केले. तर गर्दी आणि हंगामामुळे नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर चेंगराचेंगरी झाल्याचा दावा रेल्वे अधिकाऱ्यांनी फेटाळून लावला आहे. रेल्वे म्हटले, ही घटना महाकुंभसाठी हजारो भक्त प्लॅटफॉर्मवर एकत्रित आल्याने घडली.

पंतप्रधानांनी व्यक्त केले दुःख

नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीत अनेकांचा मृयू झाला. या घटनेप्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी एक्सवर टाकलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर घडलेल्या चेंगराचेंगरीमुळे व्यथित झालो आहे. ज्यांनी आपल्या जवळच्या व्यक्तींना गमावले आहे त्यांच्यासोबत माझ्या संवेदना आहेत. जखमींना लवकर बरे करण्याची देवाला प्रार्थना करतो. तसेच या सर्व लोकांना सर्वतोपरी मदत करावे असे अधिकाऱ्यांना सांगतो.

राष्ट्रपतींनी व्यक्त केला शोक

नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर

झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दुःख व्यक्त केले आहे. एक्सवर करण्यात आलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीत लोकांचा मृत्यू झाल्याची बातमी ऐकून खूप दुःख झाले. मी या चेंगराचेंगरीत बळी ठरलेल्यांच्या कुटुंबियांप्रती संवेदना व्यक्त करतो. तसेच जखमी लोक लवकरात लवकर बरे व्हावेत अशी प्रार्थना करते.

नवी दिल्ली चेंगराचेंगरी प्रकरण, मृतांच्या कुटुंबियांना १० लाख आणि जखमींना २.५ लाख रूपये मदतीची घोषणा

नवी दिल्ली रेल्वे स्थानकात शनिवारी रात्री झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये १८ जणांना आपला जीव गमवावा लागला. यात अनेक जण जखमी झाले. या दुर्घटनेप्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी, दिल्लीचे उपराज्यपाल आणि विरोधी पक्षांच्या अनेक नेत्यांनी दुःख व्यक्त केले आहे. यातच अपघातात पीडितग्रस्तांसाठी मृतांच्या कुटुंबियांना १० लाख रूपये तर गंभीर जखमी झालेल्यांसाठी २.५ लाख आणि किरकोळ जखमींसाठी लोकांना १ लाखांची मदतीची घोषणा केली आहे.

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्ली रेल्वे स्थानकात झालेल्या मृत्यू प्रकरणात दुःख व्यक्त केले आहे. वैष्णव यांनी एक्सवर रेल्वे स्थानकात झालेल्या चेंगराचेंगरीमुळे दुःखी आहे. माझ्या प्रार्थना त्या सर्व लोकांसोबत आहेत ज्यांनी आपल्या कुटुंबियांनी गमावले आहे.

सरकारकडून मृतांच्या नावांची यादी जाहीर

१. आहा देवी पत्नी रविन्दी नाथ, निवासी बक्सर बिहार, वय ७९ वर्ष, २. पिंकी देवी पत्नी उपेन्द्र शर्मा, निवासी संगम विहार दिल्ली, वय ४१ वर्ष, ३. शीला देवी पत्नी उमेश गिरी, निवासी सरिता विहार दिल्ली, वय ५० वर्ष, ४. व्योम पुत्र धर्मवीर, निवासी बवाना दिल्ली, वय २५ वर्ष, ५. पूनम देवी पत्नी मेघनाथ, निवासी सारण बिहार, वय ४० वर्ष, ६. ललिता देवी पत्नी संतोष, निवासी परना बिहार, वय ३५ वर्ष, ७. सुरुचि पुत्री मनोज शाह, निवासी मुजफ्फरपुर बिहार, वय ११ वर्ष, ८. कृष्णा देवी पत्नी विजय शाह, निवासी समस्तीपुर बिहार, वय ४० वर्ष, ९. विजय साह पुत्र राम सरूप साह, निवासी समस्तीपुर बिहार, वय १५ वर्ष, १०. नीरज पुत्र इंद्रजीत पासवान, निवासी वैशाली बिहार, वय १२ वर्ष, ११. शांति देवी पत्नी राज कुमार मांझी, निवासी नवादा बिहार, वय ४० वर्ष, १२. पूजा कुमार पुत्री राज कुमार मांझी, निवासी नवादा बिहार, वय ८ वर्ष, १३. संगीता मलिक पत्नी मोहित मलिक, निवासी भिवानी हरियाणा, वय ३४ वर्ष, १४. पूनम पत्नी वीरेंद्र सिंह निवासी, महावीर एन्क्लेव, वय ३४ वर्ष, १५. ममता झा पत्नी विपिन झा निवासी, नांगलोई दिल्ली, वय ४० वर्ष, १६. रिया सिंह पुत्री ओपिल सिंह, निवासी सागरपुर दिल्ली, वय ७ वर्ष, १७. बेबी कुमारी पुत्री प्रभु साह, निवासी बिजवासन दिल्ली, वय २४ वर्ष, १८. मनोज पुत्र पंचदेव कुशवाह, निवासी नांगलोई दिल्ली, वय ४७ वर्ष.

देशाच्या विकासात आर्थिक संस्थांचा मोलाचा वाटा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेचा रौप्य महोत्सवी सोहळा

चंद्रपूर, दि. १६ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला बळकटी दिली आहे. त्यांनी भारतातील प्रत्येक नागरिकाला बँकिंग क्षेत्रासोबत जोडले आहे. आज भारतातील प्रत्येक नागरिकाचे बँक खाते आहे. त्यामुळे डीजीटल ओळख निर्माण झाली आहे. त्याचा थेट फायदा नागरिकांना मिळत आहे. देशाच्या व सर्वसामान्य नागरिकांच्या विकासात आर्थिक संस्थांचा मोलाचा वाटा असून जेथे आर्थिक संस्था उभ्या राहतात, तेथे विकास भरभरून होतो, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेच्या रौप्य महोत्सवी सोहळ्यानिमित्त प्रियदर्शनी इंदिरा सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.

सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेने २५ वर्ष यशस्वीपणे पूर्ण केले, असे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, सहकार क्षेत्रात विदर्भातील एक अग्रगण्य बँक म्हणून सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेची ओळख आहे. महिलांना अर्थकारण समजते.

बचत करणे हा महिलांचा मूळ गुणधर्म आहे. सहकारी बँकेवर नागरिकांचा विश्वास असतो. या बँकेबद्दल सामान्य माणसाला आपुलकी असते. बँकेने सुद्धा दिलेले कर्ज शिस्तीमध्ये परत घेतले पाहिजे. आज ३०० कोटींची उलाढाल असलेल्या सन्मित्र बँकेचा एनपीए ०.५ टक्क्यांच्या खाली आहे, ही अतिशय उत्कृष्ट कामगिरी आहे.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, सहकार क्षेत्रामध्ये महाराष्ट्राने चांगली प्रगती केली आहे. व्यावसायिक बँकांसमोर सहकारी बँकेने आव्हान उभे केले आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात सहकारी बँका टिकतील का, असा प्रश्न उपस्थित होत असताना सन्मित्र सारख्या बँकांनी हे आव्हान चांगल्या पद्धतीने स्वीकारून यशस्वीपणे वाटचाल केली आहे. आज या बँकेने कोर बँकिंग, डिजिटल बँकिंग पद्धती स्वीकारली आहे. सन्मित्र बँकेने ग्राहकांच्या सुरक्षेचे विषय हाती घेतले आहेत. बँकांकडून नागरिकांना कर्ज दिली जातात. त्यामुळे नागरिक स्वतःच्या पायावर उभे राहून व्यवसाय करीत आहे. सन्मित्र बँकेने सुद्धा नागरिकांना कर्ज उपलब्ध करून दिले आहेत. त्यातून त्यांनी रोजगार उभा केला. त्यामुळे अर्थव्यवस्थेची चक्र चालण्यास मदत झाली. या बँकेने पुढील वाटचाल अधिक जोमाने करावी.

संयुक्त राष्ट्र संघटनेने २०२५ हे वर्ष सहकार वर्ष म्हणून जाहीर केले आहे. याच वर्षी सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेचा रौप्य महोत्सव होत आहे, ही आनंदाची बाब आहे. भविष्यात आणखी दमदार पाऊल टाकून ५०० कोटी, ७५० कोटी आणि १००० कोटीचा टप्पा बँकेने पार करावा. तसेच इतर सहकारी बँकांसाठी सन्मित्र बँक एक रोल मॉडेल म्हणून उभी राहावी, अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके म्हणाले, सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेचा विस्तार सहा-सात जिल्ह्यात झाला असून महिलांना आर्थिक सक्षम करणे, हेच या बँकेचे मुख्य उद्दिष्ट आहे. या जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून बँकेला नेहमीच सहकार्य राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

प्रास्ताविकात संचालिका शोभाताई फडणवीस म्हणाल्या, सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेच्या रौप्य महोत्सवाला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहिले, याचा मनापासून आनंद आहे. बँकेची वाटचाल यशस्वीपणे होत असून पुढे जाण्याचा ध्यास आम्ही घेतला आहे. आज सन्मित्र बँकेच्या सर्व शाखांमध्ये एटीएम, डीजीटल बँकींग आदी सोयीसुविधा आहेत. विशेष म्हणजे आमच्या बँकेचा एनपीए कमी आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी बँकेच्या अध्यक्षा डॉ. रजनी हजारे यांनीसुध्दा मनोगत व्यक्त केले.

तत्पुर्वी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'लक्षलक्षिता' या स्मरणिकेचे विमोचन करण्यात आले. तसेच चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला कर्मवीर मा.सां. कन्नमवार यांचे नाव दिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन कीर्ति चांदे यांनी तर आभार माधवी तांबेकर यांनी मानले.

यावेळी राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, आमदार सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, किशोर जोरगेवार, कीर्तिकुमार भांगडीया, करण देवतळे, देवराव भोंगळे, माजी मंत्री व बँकेच्या संचालिका शोभाताई फडणवीस, अध्यक्षा डॉ. रजनी हजारे, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, मनपा आयुक्त विपीन पालीवाल आदी उपस्थित होते.

कुंभमेळ्याच्या माध्यमातून समाजाच्या एकतेचा योग : देवेंद्र फडणवीस

नागपूर, दि. १६ – प्रयागराज येथे सनातन संस्कृतीचे भव्य दर्शन घडविणारा कुंभमेळा सुरू आहे. आस्थेचा असा भव्य संगम जगात कुठेही पाहायला मिळणार नाही. मानवी संस्कृती आणि सभ्यतेमध्ये हजारो वर्षापासून हा संगम आपल्याला कुंभमेळ्याच्या निमित्ताने पाहायला मिळतो. भाविक जात, भाषा, पंथ विसरून कुंभमेळ्यात एकत्रित येतात. त्यामुळे हा समाजाच्या एकतेचा योग असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

शहरातील रेशीमबाग मैदानात आयोजित 'महाकुंभ प्रयाग योग' कार्यक्रमाप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

५० कोटींपेक्षा जास्त भाविकांनी आतापर्यंत कुंभमेळ्यात स्नान केले. ज्या भाविकांना कुंभमेळ्यात जाण्याचा योग आला नाही त्यांच्यासाठी प्रयागराज येथील संगमावरील जल नागपुरात आणण्यात आले आहे. यासाठी महाकुंभ प्रयाग योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले.

आजवर कोट्यवधी भाविकांनी महाकुंभादरम्यान प्रयागराज येथील त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान केले आहे. पण ज्यांना तेथे जाणे शक्य नाही अशांनाही या पवित्र संगम जलाच्या स्नानाची अनुभूती व्हावी या अनुषंगाने प्रयागराज येथील जल रामटेकमार्गे नागपुरात आणण्यात आले होते. या अनुषंगाने 'महाकुंभ प्रयाग योग' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास द सत्संग फाउंडेशन, नागपूर केंद्राचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे, राजेश लोया, अमेय हेटे आदी यावेळी उपस्थित होते.

जन्मदात्याने मारले चार वर्षांच्या मुलीला जमिनीवर आपटून

मुंबई : मुंबईत मानवतेला काळिमा फासणारी घटना घडली आहे. जन्मदात्याने चार वर्षांच्या मुलीला जमिनीवर आपटून मारले. या प्रकरणात व्ही. बी. नगर पोलिसांनी आरोपी बापावर गुन्हा नोंदवला आहे. परवेझ सिद्धिकी याला पोलिसांनी चार वर्षांच्या मुलीच्य हत्येप्रकरणी अटक केली आहे.

परवेझ सिद्धिकी याचा त्याची दुसरी पत्नी सबा हिच्यासोबत वाद झाला. वाद वाढला आणि परवेझ सिद्धिकीने सबाला बेदम मारहाण केली. यानंतर त्याने चार वर्षांच्या आफिया हिला जोरात जमिनीवर आपटले. जमिनीवर जोरात आपटव्यामुळे आफिया गंभीर जखमी झाली. तिला उपचारांसाठी तातडीने भाभा रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी केली आणि आफियावर उपचार सुरू केले. पण थोड्याच वेळात आफियाने प्राण सोडले. तपासणी करुन डॉक्टरांनी आफियाचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले. या प्रकरणी पुढील पोलीस तपास सुरू आहे.

मित्राने केली मित्राची हत्या, मुंबईतील धक्कादायक घटना

मुंबई : मित्राने मित्राची हत्या केल्याची धक्कादायक घटना मुंबईतील अंधेरी येथे घडली. सुजीत हरिवंश सिंह असे मृत व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणात पोलिसांनी आरोपी सुनील परशुराम कोकाटे याला अटक केली आहे. सुजीत आणि सुनील हे दोघे शेजारी होते तसेच एकमेकांचे मित्र होते. काही दिवसांपूर्वी दोघांमध्ये किरकोळ मुद्यावरुन वाद झाला. हा वाद वाढला. अखेर सुनीलने सुजीतला रस्त्यात गाठले. यावेळी दोघांमध्ये पुन्हा वाद झाला आणि हा वाद शमत नव्हता. अखेर सुनीलने चाकूने सुजीतवर हल्ला केला. या हल्ल्यात सुजीत हरिवंश सिंह याचा मृत्यू झाला. पोलिसांनी सुजीतच्या हत्येप्रकरणी सुनील परशुराम कोकाटे याला अटक केली. पोलिसांचा या प्रकरणातील पुढील तपास सुरू आहे.

पाणलोट यात्रेस गोळेगावपासुन सुरुवात

छत्रपती संभाजीनगर, दि.१६ : प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत पाणलोट यात्रेचा प्रारंभ मौजे. गोळेगाव, तालुका खुलताबाद येथून शनिवारी (दि.८) करण्यात आला.

आयुक्त, मृद व जलसंधारण तथा मुख्य कार्यकारी अधिकारी वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा प्रकाश खपले यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. अपर आयुक्त (जलसंधारण) मृद व जलसंधारण आयुक्तालय छत्रपती संभाजीनगर नितीन दुसाने, प्रादेशिक जिल्हा जलसंधारण अधिकारी अजित कुमार परांडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी पी .आर .देशमुख, जिल्हा जलसंधारण अधिकारी जालना एस .एस. वाघमारे, जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा सदस्य सचिव समन्वय अधिकारी नरेंद्र कटके, प्रभारी उपविभागीय कृषी अधिकारी वैजापूर वेंकटेश ठके, तालुका कृषी अधिकारी खुलताबाद ज्ञानेश्वर तारगे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी खुलताबाद लांडगे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी पैठण राठोड, सहाय्यक जिल्हा जलसंधारण अधिकारी शेख, उपविभागीय जलसंधारण अधिकारी छत्रपती संभाजीनगर श्रीमती अरदवड, सरपंच गोळेगाव श्रीमती आवटे, उपसरपंच संतोष जोशी आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गोळेगाव येथील शेततळे कामाचे लोकार्पण, भूमिपूजन करण्यात आले.तसेच महिला बचत गटांच्या स्टॉल्सची पाहणी करून उपस्थितांना पाणलोटबाबत मार्गदर्शन केले. उपस्थितांनी पाणलोट शपथ घेतली. शालेय विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. कलापथकांनी पाणलोट जनजागृतीसाठी पोवाडा सादर केला.

मंडळ कृषी अधिकारी पैठण पाडळे, कृषी पर्यवेक्षक खुलताबाद गायट, डेंगळे, जिल्हा प्रकल्प समन्वयक मिलिंद वानखेडे, तालुका समन्वयक किशोर डी. कोल्हे, तालुका समन्वयक सुनिल एस. खोतकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक जालना टी. एल. भोजने तसेच जलसंधारण विभागातील अधिकारी/ कर्मचारी तसेच स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, महिला बचत गटाच्या महिला, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपविभागीय जलसंधारण अधिकारी लांडगे यांनी आभार मानले.

पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यातून ४७८ उमेदवारांची निवड

छत्रपती संभाजीनगर,दि.१६ : कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातर्फे आयोजीत पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात ४७९ उमेदवारांची निवड करण्यात आली, असे सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी कळविले आहे. ३३१ जणांची प्राथमिक तर १४८ जणांची अंतिम निवड झाली आहे. एम.आय.डी.सी वाळूज येथील श्रीनाथ कॉलेज ऑफ फार्मसी, हायटेक महाविद्यालय परिसर येथे रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. उपआयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालय श्रीमती विद्या शितोळे यांनी उपस्थित उमेदवारांना मार्गदर्शन केले.सहायक संचालक, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, भारत सरकार श्रीमती ऋजुता बनकर यांनी प्रधानमंत्री कार्यप्रशिक्षण योजनेची माहिती दिली व उमेदवारांना सदर योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.मसिआचे अर्जून गायकवाड,भारतीय ग्रामीण पुनर्रचना या संस्थेचे सचिव व कार्यक्रमाचे अध्यक्ष एकनाथराव जाधव यांनी मार्गदर्शन केले. या मेळाव्यात वॉकहार्ड रिसर्च सेंटर, रत्नप्रभा मोटर्स, फोर्ब्स प्रेसीशन टूल्स ड मशिन पार्ट्स., लिभेर अप्लायंन्सेस प्रा.लि., अलंकार ग्रूप, ग्रीव्हज कॉटन प्रा.लि., वोकहार्डखार्ड लि., पॅरासन मशीनरी इं. प्रा.लि., नवभारत फर्टीलायझर्स लि, एक्सेल प्लेसमेंट, पगारीया ऑटो, देवगीरी नागरी सहकारी बँक लि., अजंता फार्मा लि., सवेरा फार्मा, मायलन लॅबोरेटरी लि. ओम साई मॅन पावर,स्टरलाईइ टेक्नॉलॉजी, लुपीन ली., आमाधने प्रा.लि. इंडूरंन्स ली., एक्सीडी इंडिया ली. इत्यादी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नामांकित नियोक्त्यांनी सहभाग दर्शवून उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. या रोजगार मेळाव्यातून ३३१ उमेदवारांची प्राथमिक व १४८ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली,असे कळविण्यात आले आहे.